International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीत महानुभाव पंथाचे योगदान

***प्रा. डॉ. के. बी. शिरसे***
*इतिहास विभाग प्रमुख,*
*गोपीकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड जि. यवतमाळ*
***Corresponding Author –प्रा. डॉ. के. बी. शिरसे***
**DOI - 10.5281/zenodo.15240812**

**प्रस्तावना**:

महानुभव पंथाचे महाराष्ट्राच्या धार्मीक, सामाजिक व सांस्कृतिक सुधारणांच्या चळवळीमध्ये अत्यंत महत्वाचे योगदान आहे. बाराव्या शतकातील महाराष्ट्रातील यादवांची राजवट ही अत्यंत धर्माभिमानी असल्याची दिसून येते. यादव साम्राज्याच्या काळात व्रतवैकल्य, यज्ञयाग इत्यादी कर्मकांडाचे प्रस्थ बेसुमार माजलेले होते. हेमाद्री पंडीतासारखे, यादव सम्राटाचे करणाधिप चतुवर्ग चिंतामणी सारख्या संस्कृत ग्रंथातून त्या कर्मकांडाचे महात्म्य वर्णन करीत होते. स्त्रिया आणि शुद्रातिशुद्र हे जे हिंदू समाजाचे उपेक्षित आणि दलित असे बहूसंख्य घटक होते. त्यांना या समाजव्यवस्थेत कोणतेच स्थान नव्हते. धार्मीक, सामाजिक समतेचा हक्क त्यांना प्राप्त झालेला नव्हता. समाजव्यवस्था वर्णव्यवस्थेवर आधारलेली असून समाज अनेक जाती पोटजातीत विभागला गेला होता. त्या काळात अस्पृश्यतेच्या भयंकर रुढीने समाजाचे विभाजन झाले होते. सवर्ण वर्णातील लोकांना कुत्रा, मांजर, गाय या पशुच्या स्पर्शाचा विटाळ वाटत नसे हे लोक मुंग्यांना साखर अर्पित परंतु ह्या स्वधर्मीयांचा स्पर्श ते अपवित्र मानीत. या काळात गुजारतमध्ये जन्म घेतलेल्या श्री. चक्रधरस्वामी यांनी महाराष्ट्रात येवून येथील पारंपारिक समाजव्यवस्थेतील जून्या परंपरावादी विचारसरणीला छेद देऊन नव्या मानवतावादी, समतामूलक विचारांनी समाजाला नवी दिशा दिली. त्यांच्या मते, समाजव्यवस्था प्रस्तापित करणे आणि परस्पर सहकार्याची व सहानुभूतीची भावना प्रस्तुत करणे हे धर्माचे एकमेव कार्य आहे. हे उद्देश जर साध्य होत नसेल तर तो धर्म नव्हे एका नव्या मानव समाजाच्या प्रस्थापनेसाठी नवा पंथ निर्माण व्हावा ही चक्रधरस्वामीची इच्छा होती. तो मानवसमाज कोणत्याही जात, धर्म, पंथापेक्षा वेगळा असेल. मानवसमुहात ऐक्य भावनेची जाणीव राहावी आणि परस्परांच्या कल्याणात परस्परांचे कल्याण असावे असा या पाठीमागचा त्यांचा ध्येयवाद होता. येथील प्राचीन संस्कृती विस्कटलेली आहे असा त्यांना अनुभव आला. येथील विद्वान आणि धर्माधिकारी त्यांच्या मनात आपल्यापेक्षा कनिष्ठ जातीसंबंधी चांगल्या भावना नाहीत. प्रत्येकजन खालच्या जातीला आपल्या सेवेत राबविण्याचा प्रयत्न करतो. ही समाजाची विकृत अवस्था होय. ती बदलली पाहिजे हे त्यांचे कार्य या काळात क्रांतीकारी ठरले. त्यांच्या महानुभाव पंथाने जात, धर्म, पंथ, संप्रदाय, स्त्री, पुरुष, प्रदेष, भाषा असा कोणताही भेदभाव न करता सर्वांसाठी ह्या पंथात प्रवेशासाठी मार्ग मोकळा केला.

वैदीक काळापासून भारतीय समाजात वर्णव्यवस्था निर्माण झाली होती. समाजाने त्या पद्धतीनेच आचरण करावे हा दंडक येथील धर्मप्रमुखाने ठरवून दिला होता. विषमता, शोषणावर आधारित येथील धर्मव्यवस्था होती. समाजातील तळागाळातील

लोकांवर येथील धर्मव्यवस्था अत्यंत सुरपणे अत्याचार करीत होती. या परिस्थितीत महाराष्ट्रातील तळागाळातील समाज कुचेष्टेने व अन्यायाच्या पिडेने त्रस्त झाला होता. या सर्व परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण करुन श्री. चक्रधरस्वामीनी इ.स. तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात महानुभव पंथाची स्थापना केली.

वारकरी पंथाचे प्रर्वतक संत ज्ञानेश्वर यांचा जन्म इ. स. 1275 ला झाला असे मानले तर महानुभाव पंथाचे प्रर्वतक श्री. चक्रधरस्वामीनी यांचा प्रयाणकाळ इ.स. 1274 होय, म्हणजे संत ज्ञानेश्वराचा उदय होण्यापूर्वीच महानुभाव संप्रदाय महाराष्ट्रात दृढमल झाला होता असे मानावे लागते. गुजराती, मराठी आणि संस्कृत भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. पंथप्रवर्तनापूर्वी वैयक्तिक जीवनात ते निर्भय वृत्तीने राहीले असले तरी अंतरी वैराग्यमुळे निर्लेप होते, जनसाधारण विषयाच्या जाणिवेतनू सर्वसुखांचा त्याग करण्याइतकी निर्भय वृत्ती त्यांच्याजवळ होती. उदारमतवाद हा त्यांचा स्थाईभाव, स्वयपंथीयांनी इतर पंथीयांशी केलेला अनुदार वर्तन त्यांना खपत नसे. **"वैरियाचा देवो जाला तरी काई दगडे फोडावा"** असा त्यांचा विवके होता. सम दृष्टीने पाहणाऱ्या त्यांच्या वृत्तीत स्पृश्यास्पृश्य, स्त्री, पुरुष असा भेदभाव नव्हता. आपण ईश्वरावतार आहोत अशा श्रद्धेतून इतराकडून सेवा करुन घेणे त्यांना आवडत नसे. अंतराची निर्लेपता, निरहंकारित्व, सहिष्णूता, उदारमनस्कता, लोकल्याणाची तळमळ, लोकमानसात शिरून मार्मीकपणे उपदेश करण्याची कला, चमत्कारातून व्यक्त होणारे विभूतिमत्व इत्यादी असाधारण गुणसंपदेतून त्यांचे महात्मापण सिद्ध होते. इ.स. च्या तेराव्या शतकात देवगीरीच्या यादव घराण्याच्या काळात महानुभाव पंथाचा उदय झाला.

श्री. चक्रधरस्वामी या पंथाचे संस्थापक हिंदू धर्मातील जातीभेद, चातुवर्ण, हिंदू रुढी, परंपरांना विरोध करुन समतेच्या तत्त्वाचा स्विकार या पंथाने केला. श्रीकृष्णास या पंथाचे दैवत मानले. एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. महानुभाव पंथाचा प्रचार स्वतः श्री. चक्रधरस्वामींनी महाराष्ट्रभर केला, त्यांच्या वास्तव्याने पुणीत झालेली स्थळे विदर्भात मोठ्या प्रमाणात आहेत. रिद्धपूर हे महानुभवांची काशी म्हणून ओळखली जाते. हे अमरावती जिल्ह्यात चांदूरबाजार तालुक्यात असून येथे महानुभवांची अनेक मठ व मंदीरे आहेत. बुलढाणा जिल्ह्यात जाईचा देव (जाळीचा देव) हे महानुभावांचे महत्वाचे ठिकाण असून येथे महानुभावांचे मठ व मंदिरे आहेत. या पंथामध्ये समतेला महत्व देण्यात आले आहे. श्री. चक्रधरस्वामीनी आपल्या शिष्यांना चारही वर्णाच्या लोंकाकडून मिक्षा मागण्याची अनुमती दिली होती. तसेच समाजातील सर्व स्थरातील लोकांना या पंथाची दिक्षा घेता येत असे. महाराष्ट्रातील अस्पृश्य समाजातील लोकानीही या पंचाचा स्विकार केल्याचे दिसून येते. महानुभाव पंथाने धार्मीक सामाजिक क्षेत्राप्रमाणेच गाङ्मयीन, साहित्यिक क्षेत्रातही व्यापक कार्य केले आहे. या पंथाचे गाढ़े अभ्यासक वि. भी. कोलते यांच्या मते, 'मराठी वाङमयाची सुरुवात विदर्भात झाली आहे. याचे श्रेय विदर्भातील महानुभाव संप्रदायाचे आहे.' विदर्भातील दुसरे अभ्यासक य.खु.देशपांडे यांच्या मते, 'मराठी भाषांच्या आद्यग्रंथकर्त्यांमध्ये महानुभावाचे योगदान महत्वाचे आहे.' मराठी भाषेची ग्रंथ निर्मिती वऱ्हाडातील रिद्धपूर येथे मोठ्या प्रमाणात झाली. साहित्यिक क्षेत्रात त्यांची कामगिरी अत्यंत मोलाची आहे. या साहित्यनिर्मितीमधून सामाजिक समता निर्माण झाल्याचे दिसून येते. महदंबेचे धवळे, आद्यग्रंथ लिळाचरित्र या ग्रंथाची निर्मिती विदर्भाच्या धार्मिक व सामाजिक जीवनामध्ये महानुभाव पंथ अत्यंत महत्वाचा आहे. सामाजिक धार्मिक क्षेत्रात समता व सहीष्णूता निर्माण करण्याचा महत्वपूर्ण प्रयत्न या पंथाने केल्याचे दिसून येते.

श्री. चक्रधरस्वामीच्या महानुभावा पंथाने अनेक शुद्र, अतिशूद्र जातीतील लोकांना आपल्या पंथात दीक्षा देऊन सन्मानाची व प्रतिष्ठेची वागणूक दिली. ज्यावेळी समाजात कमालीची विषमता होती. धर्म आचारणानुसार समाजात जीवन जगणे कठीण होते. त्याच काळात महाराष्ट्रातील उपेक्षित समाजासाठी

आनंदाने व प्रतिष्ठेने जगण्यासाठी एक नवा जीवनमार्ग म्हणून महानुभाव पंथ विकसित झाला. त्याला कारण पूर्वाश्रमीच्या समाजजीवनात सामान्य मानसाने भोगलेल्या विषमतेच्या यातनातून सुटका करुन घेण्यासाठी बहुजन समाजाने महानुभाव पंथाचा आश्रय घेतला. या पंथामध्ये जातीभेदाला स्थान नाही.

या पंथाबद्दल सांगावयाचे म्हणजे स्त्री शुद्रादिकांना धर्ममंदिरात इतरांच्या बरोबरीने प्रवेश मिळवून दिला. मोक्षाधिकार स्त्रियांना, शुद्रांना, अतिशुद्रांना अद्यापपावेतो वैदिक मतानुयांनी नाकारला होता. मोक्षप्राप्तीचा मार्ग सर्वांना मोकळा आहे, असे श्री. चक्रधरस्वामीनी उद्घोषीत केले. त्यामुळे त्यांच्या अनुयायात नागदेवाचार्याप्रमाणे महदाईसा, उमाईसा, बाईसा या स्त्रीयाही होत्या, पुरुषांचा जीव आहे स्त्रियांना मात्र जीव नाही. पुरुषांचा एक देव व स्त्रीयांचा दसरा देव असे मानण्याचे काही कारण नाही असे त्यांनी सारंग पंडीताला एका प्रसंगी सांगितल्याचा उल्लेख लिळाचरित्रात आहे. वैदिक परंपरागत चालत आलेल्या चातुर्वण्याला श्री. चक्रधरांच्या या पंथाने मान्यता तर दिली नाहीच परंतु त्यावर त्यांनी आपले टिकास्त्र उपसले. त्यांनी जे विधीनिषेध आपल्या अनुयायांना घालून दिले होते. त्यामुळे आपोआपच या चातुर्वण्याचा आडसर दूर झाला होता. चारही वर्णात भिक्षा माण्यास दिलेली परवानगी स्वतः मांतगाने दिलेला लाडू सेवन करुन इतर शिष्यांना वाटणे, प्रसंगी विशेष त्यांनी त्यांच्या घरी जेवन घेणे किंवा चांभाराच्या हातचा विडा खाणे, अशा अनेक गोष्टी श्री. चक्रधरस्वामीनी आपल्या जीवनात आचरल्या होत्या. त्याचबरोबर या पंथाने स्त्रीपुरुषांना सन्यास घेण्याची मोकळीक ठेवली. वैदीक धर्मीयांनी स्त्रियांना संन्यास निषिद ठरविला आहे. महानुभाव पंथाच्या संस्थापकांनी चार्तुवर्ण तर अमान्य केलाच परंतु शुचि अशुचित्व, श्रेष्ठ कनिष्ठ इत्यादी कल्पनांना देखील त्याग केला. ब्राम्हण किंवा महार, मांग, चांभार इत्यादी अधम अशी कल्पना करणे हे चूक आहे असे विचार बंधातील उल्लेख सांगतात, **"भिक्षा चारी वर्णीयाकडे मागावी ओळखतेयाचेया घरा न वचावे, तोरण मंडळाचेया घरा न वचावे,"** जातीच्या आडसर अभेद असतांना जातीभेद विरहित समाजरचना निर्माण व्हावी व एक आदर्श असा समतावादी नवसमाज महानुभाव पंथाला निर्माण करावयाचा होता. मनुष्यनिर्मित जातीच स्तोम नष्ट करण्यासाठी, जातीव्यवस्थेच निर्मूलन करण्यासाठी श्री. चक्रधरस्वामींनी सांगितलेला आचारधर्म या पंथातील आचार्य स्वतः पाळीत असत.

लिळाचरित्र या ग्रंथात आलेल्या उल्लेखाप्रमाणे तेल्याच्या घरी भाकरी स्वामी खातात व त्याचे विश्लेषण करताना म्हणतात की, भाकरी तेल्याची नव्हे तर जोंधळयाची आहे. तसेच लिळाचरित्र ग्रंथात तेविसाव्या लिळेमध्ये मांगाच्या पाणपोईतले पाणी ते प्याले असा उल्लेख आढळतो. याचा अर्थ असा की समाजातील जो कनिष्ठ समजला जाणारा वर्ग आहे त्याला सन्मानाची वागणूक देऊन त्याच्या व्यक्तीमत्वाचा आदर समाजात निर्माण व्हावा ही अपेक्षा या पंथाची होती. त्याप्रमाणे राऊळ मातंग- महारांच्या घरोघरी विचारताती आणि तैसेची दिशीता ब्राम्हणांची घरी विचारताती ही लिळाचरित्रातील सत्तेचाळीसावी लिळा पाहिल्यावर मातंग आणि महार जातीतही आचार्याचं येणजाण होत व जातीनिषेध काहीही नव्हता ही वृत्ती महानुभाव आचार्याच्या मनाच्या मोकळेपणाची व समभावनेची दिसून येते. म्हणून आपल्या पंथाच तत्वज्ञान सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवित असताना समाज समतेवर आधारित असावा, असे महानुभाव पंथाच्या लिखीत ग्रंथात त्याचे उल्लेख सापडतात.

मराठी भाषेतील आद्य कवयित्री याच पंथाने महदंबेच्या रुपाने दिली. साती ग्रंथादी मराठी भाषेतील वाङ्मय याच पंथातील आचार्यांनी दिली. या पंथातील ग्रंथरचनेच्या कार्यास ज्ञानेश्वरापूर्वी दहा ते बारा वर्षे तरी आरंभ झाला होता. श्री. चक्रधरस्वामीच्या परिवारात आबाईसा, उमाईसा, महदाईसा उर्फ महदंबा, इल्हाइसा उर्फ साधे, बाईसा अशा तेरा शिष्या होत्या. ईश्वरप्राप्तीचा मार्ग अनुसरणाऱ्यामध्ये स्त्री-पुरुष हा भेदभाव करणे इष्ट नाही. हीच दृष्टी यामध्ये असली पाहिजे. स्त्रियांना पंथात

प्रवेश दिल्यानंतर अर्थात शिवाशिव किंवा विटाळाबद्दलही उदार दृष्टीकोन स्विकारणारे क्रमप्राप्त होते. श्री. चक्रधरस्वामीनी महादाईसा व उमाइसा या शिष्यर्णीना उपदेश करताना विटाळाची कल्पना सोडण्यास सांगितले आहे. शुद्राअतिशुद्रांना ज्ञान देण्यासाठी श्री. चक्रधरस्वामीने शिष्य नागदेवाचार्य केसोबासांना संस्कृतमध्ये ग्रंथरचना न करता मराठीमध्ये करण्याचा आदेश देतात.

अशा रितीने बाराव्या शतकातील या समाजात देवतापुजन, व्रतवैकल्य, दानधर्म, चार्तुवर्ण याचा सुळसुळाट मुक्तपणे माजलेला होता. अशा समाजातील शुद्रातिशुद्रांना माणूस म्हणून जगता यावे म्हणून महानुभाव आचार्यानी असे वर्तन केले. त्यांची दृष्टी सर्वसमावेशक होती, ब्राम्हणांइतकेच त्यांनी अस्पृश्यांनाही महत्व दिले. समाजातील उपेक्षित घटक स्त्रीयानादेखील त्यांनी समभावनेने वागविले. स्वतःच्या कृतीतीन सर्व बुरसटलेल्या पंरपरेला तडा देवून त्यांनी समाजासमोर एक नवा आदर्श उभा केला. आजच्याही समाजाने हा आदर्श गिरवावा इतका तो महान आहे. सातशे वर्षापूर्वी या महानुभाव आचार्यानी केलेली ही सामाजिक क्रांती महाराष्ट्राच्या इतिहासात खरोखरच सुवर्णाक्षरांनी लिहली जावी अशी आहे. परंतु महाराष्ट्राला भूषणावह असलेल्या या आद्य समाजसुधारकांचा इतिहास महाराष्ट्रातील अभ्यासकांना माहित नसावं हे आश्चर्य आहे.

**संदर्भ सुची:**

1. डॉ. अविनाश आवलगावकर, महानुभाव साहित्य शोधसंचार, नोव्हेंबर 2006
2. प्रा. र. रा. गोसावी- पाच भक्ती संप्रदाय, मार्च 1974
3. डॉ.पं. रा. मोकाशी, महाराष्ट्रातील पाच संप्रदाय, आवृत्ती दुसरी 1975
4. कै. मुरलीधर कोळपणकर, महानुभावांचा इतिहास 2010, महानुभाव (उपाध्ये)
5. बाळकृष्ण महानुभाव शास्त्री, महानुभाव पंथ 2014
6. डॉ. यू. म. पठाण, महानुभाव दर्शन
7. डॉ. रा. चिं. ढेरे, महानुभाव पंचकृष्ण